RBL BANK
apno ka bank

सर्वात महत्त्वपूर्ण अटी आणि नियम

प्रमुख तथ्यांचे स्टेटमेंट

घटक/ प्रमुख तथ्ये	शेरा/वर्णन
जॉइनिंग फी	प्राथमिक आणि ॲड ऑन कार्डधारकासाठी शून्य
सभासदत्व फी (वार्षिक/मासिक)	₹ 50-5,000 (एमआयटीसी मध्ये कार्डच्या प्रकारानुसार); ॲड-ऑन कार्डसाठी शून्य
कॅश ॲडव्हांस फी	रोख रक्कमेच्या 2.5% (किमान ₹ 500)
सेवा शुल्क	सरकार द्वारे निर्धारित जीएसटी दर (18% जसा लागू होतो)
रिव्हॉल्विंग क्रेडिट आणि कॅश ॲडव्हान्स दोन्हीसाठी फायनांस शुल्क	एपीआर 3.99% पर्यंत दरमहा (47.88% वार्षिक)
उशीरा देय भरणाचे शुल्क	₹ 5 ते 1,300 च्या श्रेणीत ग्राहकाच्या एकूण थकीत रक्कमेच्या आधारे उशीरा देय भरणा फी आकारली जाते
क्रेडिटची मर्यादा	वेलकम लेटर आणि मासिक स्टेटमेंट्समध्ये खुलासा
उपलब्ध क्रेडिटची मर्यादा	मासिक स्टेटमेंट्समध्ये खुलासा
रोख रक्कम काढण्याची मर्यादा	मासिक स्टेटमेंट्समध्ये खुलासा
बिलिंग स्टेटमेंटस् - वारंवारता आणि पाठवण्याचे माध्यम	फिजिकल/ई-स्टेटमेंट महिन्यातून एकदा पाठवले जाते (निवडलेल्या पसंतीनुसार माध्यम)

भरणा करायची किमान रक्कम (किमान देय रक्कम)	एकूण जीएसटी + वर्तमान महिन्याचे ईएमआय डेबिट्स + 100% फी/शुल्क + [((किरकोळ खर्च, रोख रक्कम, व्याज) ची 5%) किंवा ₹ 200 पैकी जास्त असेल ती] + आधी भरणान न केलेले एमएडी (कोणतेही असल्यास)*
देय भरणाची पद्धत	स्टँडिंग इंस्ट्रक्शन (एनएसीएच) द्वारे नियतकालिक भरणा किंवा एनईएफटी/चेक/मायकार्डअॅप/ ऑनलाइन द्वारे एकदा भरणा
बिल विवादांचे उपाय	स्टेटमेंट जारी केल्याच्या 30 दिवसांच्या आत कार्डमेंबर वेबसाइटवर उपलब्ध विवाद फॉर्म सही करून आरबीएल बँकेला ईमेल करू किंवा पाठवू शकतात (https://rblbank.com/ download-forms/ credit-cards)
कार्ड-जारीकर्त्याचा संपूर्ण टप्पाल पत्ता	कार्ड सर्विसेस, आरबीएल बँक लिमिटेड, युनिट 306-311, तिसरा मजला, जेएमडी मेगापोलिस, सोहना रोड, सेक्टर - 48, गुरुग्राम, हरियाणा - 122018
ग्राहक सेवा केंद्राच्या संपर्काचे तपशील	टोल फ्री क्रमांक: 022-6232 7777 cardservices@rblbank.com वर आम्हाला ईमेल करा बजाज फिनसर्व आरबीएल बँक सुपरकार्ड्स साठी टोल फ्री क्रमांक: 022-7119 0900 supercardservice@ rblbank.com वर आम्हाला ईमेल करा

तक्रार निवारण अधिकाऱ्याच्या संपर्काचे तपशील	श्री. विकास निगम - 022-71432700 वर कॉल करा किंवा principalnodalofficer@rblbank.com वर ईमेल करा

*सर्व कार्डसाठी, फक्त प्लॅटिनम ॲडवांटेज सुपरकार्ड वगळून, ज्यासाठी 20% आहे

"सर्वात महत्त्वपूर्ण अटी आणि नियम" (**"एमआयटीसी"**) आणि इथे दिलेली सर्व माहिती आरबीएल बँक लिमिटेड (**"आरबीएल बँक"**) द्वारे जारी करण्यात आलेल्या सर्व क्रेडिट कार्डांना लागू होतात, जे आरबीएल बँक क्रेडिट कार्ड मेंबर करार आणि उत्पादन अटी आणि नियमांसोबत वाचायचे आणि समजून घ्यायचे आहेत. सदर एमआयटीसी बँकेच्या विवेकबुद्धीनुसार आणि वेळोवेळी लागू असलेल्या कायद्यांनुसार बदलू शकतात.

(A) फी आणि शुल्क

(i) कार्ड मेंबर द्वारे देय असलेली वार्षिक सभासदत्व फी

क्रेडिट कार्डचा प्रकार	**वार्षिक फी (पहिले वर्ष)**	**वार्षिक फी (दुसऱ्या वर्षापासून पुढे)**
इनसिग्निया	शून्य	शून्य
आयकॉन	₹ 5,000	₹ 5,000
वर्ल्ड सफारी	₹ 3,000	₹ 3,000
मनीटॅप ब्लॅक	₹ 3,000	₹ 3,000
ब्लॉकबस्टर	₹ 3,000	₹ 3,000
प्लॅटिनम मॅक्सिमा प्लस	₹ 2,500	₹ 2,500
प्लॅटिनम मॅक्सिमा	₹ 2,000	₹ 2,000
प्लॅटिनम डिलाइट	₹ 1,000	₹ 1,000 (₹ 2 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)
पॉपकॉर्न	₹ 1,000	₹ 1,000
मूव्हीज अँड मोर	₹ 1,000	₹ 1,000 (₹ 1.5 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)

क्रेडिट कार्डचा प्रकार	वार्षिक फी (पहिले वर्ष)	वार्षिक फी (दुसऱ्या वर्षापासून पुढे)
टायटेनियम डिलाइट	₹ 750	₹ 750 (₹ 1.5 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)
मोकॅश	₹ 500	₹ 500 (₹ 1 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)
शॉपराइट	₹ 500	₹ 500 (₹ 1.5 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)
प्ले	₹ 500	₹ 500 (₹ 1.5 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)
वीकार्ड	शून्य	₹ 500 (₹ 1 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)
पैसाबाजार ड्युअट प्लस कार्ड	₹ 1499	₹ 1499 (₹ 4 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)
01 सप्टेंबर 2022 आधी जारी केलेले पैसाबाजार ड्युअट (याआधी "पैसा ऑन डिमांड" म्हणून परिचित)	₹ 500	₹ 500
01 सप्टेंबर 2022 नंतर जारी केलेले पैसाबाजार ड्युअट (याआधी "पैसा ऑन डिमांड" म्हणून परिचित)	शून्य	शून्य
फन+	₹ 499	₹ 499 (₹ 1.5 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)
मनीटॅप	₹ 499	₹ 499 (₹ 2 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)

लेझीपे	शून्य	शून्य
बँकबाजार सेवमॅक्स प्रो	1,499	1,499
बँकबाजार सेवमॅक्स	शून्य	शून्य
यूनिक (कस्टमायजेबल)	कस्टम शुल्क	कस्टम शुल्क
कूकीज (10 मे 2021 आधी जारी केलेल्या कार्ड्ससाठी)	₹ 500	₹ 500
पार्क प्लस	₹ 999	₹ 999
रिंग	शून्य	₹ 499 (₹ 1.5 लाख किंवा अधिक वार्षिक खर्च केल्यास माफ)
आयग्लोब	₹ 3,000	₹ 3,000
प्लॅटिनम चॉईस सुपरकार्ड	₹ 499	₹ 499
प्लॅटिनम क्लासिक सुपरकार्ड	₹ 499	₹ 499
प्लॅटिनम ॲडवांटेज सुपरकार्ड	₹ 499	₹ 499
प्लॅटिनम शॉपस्मार्ट सुपरकार्ड	₹ 499	₹ 499
प्लॅटिनम शॉपडेली सुपरकार्ड	₹ 499	₹ 499
प्लॅटिनम प्लस सुपरकार्ड	₹ 999	₹ 999
प्लॅटिनम बोनस सुपरकार्ड	₹ 999	₹ 999
प्लॅटिनम शॉपगेन सुपरकार्ड	₹ 1,499	₹ 1,499
प्लॅटिनम ट्रॅवलईझी सुपरकार्ड	₹ 999	₹ 999

प्लॅटिनम प्राइम सुपरकार्ड	₹ 999	₹ 999
प्लॅटिनम मॅक्स सुपरकार्ड	₹ 999	₹ 999
प्लॅटिनम एज सुपरकार्ड	₹ 1,999	₹ 1,999
बिंज सुपरकार्ड	₹ 999	₹ 999
प्लॅटिनम लाईफईझी सुपरकार्ड	₹ 1,999	₹ 1,999
वर्ल्ड प्राइम सुपरकार्ड	₹ 2,999	₹ 2,999
वर्ल्ड मॅक्स सुपरकार्ड	₹ 2,999	₹ 2,999
वर्ल्ड प्लस सुपरकार्ड	₹ 4,999	₹ 4,999
ईझीसेवर सुपरकार्ड	₹ 499	₹ 499
मायफर्स्ट सुपरकार्ड	₹ 999	₹ 999
	मासिक फी (पहिला महिना)	**मासिक फी (दुसऱ्या महिन्यापासून पुढे)**
कूकीज (10 मे 2021 नंतर जारी केलेल्या कार्ड्ससाठी)	₹ 100	₹ 100 (मागील महिन्यात ₹ 5,000 किंवा अधिक मासिक खर्च केल्यास माफ)
मंथली ट्रीट्स (01 नोव्हेंबर 2021 आधी जारी केलेल्या कार्ड्ससाठी)	₹ 50	₹ 50 (मागील महिन्यात ₹ 3,000 किंवा अधिक मासिक खर्च केल्यास सूट)
मंथली ट्रीट्स (01 नोव्हेंबर 2021 नंतर जारी केलेल्या कार्ड्ससाठी)	₹ 75	₹ 75 (मागील महिन्यात ₹ 3,000 किंवा अधिक मासिक खर्च केल्यास सूट)

मंथली ट्रीट्स (07 डिसेंबर 2023 पासून प्रभावी)**	₹ 100	₹ 100 (मागील महिन्यात ₹ 5,000 किंवा अधिक मासिक खर्च केल्यास माफ)

***वार्षिक फी** (पहिले वर्ष) **पहिल्या** क्रेडिट कार्ड स्टेटमेंटमध्ये आकारली जाईल.

**सुधारित फी सर्व विद्यमान कार्डधारकांना लागू असेल.

(ii) आरबीएल बँकेद्वारे जारी करण्यात आलेल्या वेगवेगळ्या क्रेडिट कार्डांना लागू होणारी वार्षिक फी प्रत्येक कार्डमेंबर नुसार, आणि प्रत्येक क्रेडिट कार्डच्या विशिष्ट वर्णनानुसार बदलू शकते. लागू होणारी फी क्रेडिट कार्डासाठी अर्ज करते वेळी आणि/किंवा उल्लेखित क्रेडिट कार्ड जारी करताना कार्ड मेंबरला सांगितल्यानुसार असेल. पुढे, अशी फी, लागू होत असल्याप्रमाणे, थेट कार्ड मेंबरच्या खात्यात आकारली जाते आणि त्यानुसार कार्ड स्टेटमेंट मध्ये दर्शवली जाते. खर्चाशी संलग्न सभासदत्व फी परतवण्याच्या (जर कोणतेही) तपशीलवार अटींसाठी कृपया उत्पादनाच्या अटी आणि नियम (जेथे कुठे लागू होते तिथे) पहा.

इतर फी आणि शुल्क

ॲड-ऑन कार्ड फी	शून्य
कार्ड रिप्लेसमेंट (हरवणे/ चोरी होणे/ पुन्हा जारी करणे/ इतर कोणतीही बदलीसाठी)	शून्य, जोपर्यंत इतर प्रकारे नमूद नाही
स्टेटमेंटच्या नक्कलेचे शुल्क	शून्य
परकीय चलनातील व्यवहार/ चल आणि अचल रुपांतरण व्यवहार - मार्कअप शुल्क*	3.5% पर्यंत
	इनसिग्निया क्रेडिट कार्डांवर 1.5%
	वर्ल्ड सफारी क्रेडिट कार्ड वर 0%

आरबीएल बँकेच्या शाखांमध्ये रोख भरणा	आरबीएल बँक शाखेमध्ये केलेल्या व्यवहारांवर ₹ 100/- रोख ठेव शुल्क
रेल्वे तिकीटांच्या खरेदी/ रद्द करण्यावर अधिभार	आयआरसीटीसी सेवा शुल्क + पेमेंट गेटअवे व्यवहार शुल्क (तिकिटाच्या रक्कमेच्या 1.8% पर्यंत + आयआरसीटीसी सेवा शुल्क). तपशीलासाठी आयआरसीटीसी वेबसाइट पाहा.
इंधन खरेदीसाठी भारतातील पेट्रोल पंपांवर केलेल्या व्यवहारांसाठी इंधन व्यवहार शुल्क	इंधन व्यवहाराच्या मूल्यावर 1% अधिभार किंवा ₹ 10/- जे कोणतेही जास्त असेल (व्यापारी बँकेवर अवलंबून)
ओवरलिमिट फी / दंड** (थकीत रक्कम क्रेडिटच्या मर्यादेपेक्षा अधिक झाल्यास आकारले जाते	मर्यादेपेक्षा अधिक रक्कमेच्या 2.5% असून किमान ₹ 500 च्या अधीन आहे (09 ऑक्टोबर 2023 पासून प्रभावी)
वस्तू आणि सेवा कर	सरकारी नियमांनुसार 18% चा मानक दर आकारण्यात येईल
रिवॉर्ड रीडम्प्शन फी	सर्व क्रेडिट कार्ड्सवर कमावलेल्या तुमच्या उपलब्ध रिवॉर्ड पॉइंट्सच्या रीडम्प्शनवर ₹ 99 रिवॉर्ड रीडम्प्शन फी + जीएसटी लागू होईल. (इनसिग्निया कार्ड, इनसिग्निया प्राइम कार्ड्ससाठी रीडम्प्शन फी लागू नाही)
बँक खात्यात निधी नसल्याने - चेक रिटर्न/ डिसऑनर शुल्क ऑटो डेबिट रिवर्सल	₹ 500 (बजाज फिनसर्व आरबीएल बँक सुपरकार्ड्स साठी)
मर्चंट ईएमआय प्रक्रिया फी***	व्यापारी आउटलेट/वेबसाइट/ ॲपवर व्यवहार करते वेळी केलेल्या सर्व ईएमआय रुपांतरणावर ₹ 199 + जीएसटी

भाड्याच्या व्यवहारांवरील फी#	कोणत्याही लागू व्यापाऱ्यावर केलेल्या सर्व भाड्याच्या व्यवहांरावर व्यवहाराच्या रक्कमेची 1% फी म्हणून आकारली जाईल (01 फेब्रुवारी 2023 पासून प्रभावी)

#इथे याद्वारे स्पष्ट केले जाते की भाड्याच्या व्यवहारांच्या ओळख मास्टरकार्ड/विसा द्वारे नियुक्त केल्यानुसार एमसीसी (मर्चंट कॅटेगरी कोड) च्या आधारावर आहे. अशा व्यापारी आउटलेट/फ्रँचायजीवरील खरेदीसाठी भाड्याच्या व्यवहारांवर फी लागू होईल ज्यांनी स्वतःला भाड्यासाठी नियुक्त एमसीसी अंतर्गत नोंदणी केलेले आहे.

*09 ऑक्टोबर 2023 पासून प्रभावी, परकीय चलनांमध्ये केलेल्या सर्व व्यवहारांवर जसे लागू असेल तसे मार्कअप फी लागेल. आंतरराष्ट्रीय ठिकाणी असलेल्या (किंवा) भारतात असून परंतु परदेशात नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडे भारतीय चलनात केलेल्या सर्व व्यवहारांवर सुद्धा मार्क फी लागू होईल.

परदेशात नोंदणीकृत व्यापारी आस्थापनांमधील व्यवहारांवर सीमा पार शुल्क लागू होईल मग भलेही व्यापारी भारतात स्थित असेल.

**ओवरलिमिट फील लागू होईल जर मर्यादेपेक्षा अधिक व्यवहारामुळे थकीत रक्कम क्रेडिटच्या मर्यादपेक्षा वाढते आणि ओवरलिमिट सुविधेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाने संमती दिलेली आहे. ओवर लिमिट दंड लागू होतो जर बँक फी, शुल्क आणि व्याजाचा भरणा न केल्यामुळे थकीत रक्कम क्रेडिटच्या मर्यादेपेक्षा वाढते.

***मर्चंट ईएमआय प्रक्रिया फी विषयी तपशीलवार अटींसाठी, कृपया आरबीएल बँकेच्या वेबसाइटवर उपलब्ध मर्चंट ईएमआय अटी आणि नियम पहा.

सर्व आरबीएल बँक क्रेडिट कार्डांसाठी किरकोळ व्यवहारांच्या ईएमआय रुपांतरणावर बेस रिवॉर्ड पॉइंट्स जमा होणार नाही.यामध्ये किरकोळ व्यवहार ईएमआय (स्प्लिट-एन-पे) मध्ये रुपांतरित करणे आणि पीओएस/वेब/मोबाइल ॲपवर व्यवहार करतेवेळी केलेल्या ईएमआय रुपांतरणाच्या विनंतींचा समावेश आहे.

परकीय चलन व्यवहारांसाठी महत्त्वपूर्ण माहिती: जर एखादा व्यवहार भारतीय रुपयांव्यतिरिक्त इतर चलनात केला गेला तर तो व्यवहार भारतीय रुपयांमध्ये रूपांतरित करण्यात येईल. हे रुपांतर त्या दिवशी होईल ज्या दिवशी व्यवहार आरबीएल बँकेबरोबर सेटल केला जाईल, जो कदाचित तो दिवस नसू शकतो ज्यादिवशी व्यवहार झाला आहे. जर एखादा व्यवहार युएस डॉलर व्यतिरिक्त इतर चलनात केला गेला, तर हे रुपांतर युएस डॉलर्स च्या माध्यमातून केले जाईल, म्हणजेच प्रथम आकारलेली रक्कम युएस डॉलर मध्ये रुपांतरित करुन आणि नंतर युएस डॉलर रक्कम सेटलमेंटच्या तारखेला मास्टरकार्ड/विसा द्वारे निर्धारित रुपांदर दराने भारतीय रुपयांमध्ये रुपांतरित केली जाईल.

कृपया लक्षात घ्या: परकीय चलनातील व्यवहारांच्या सर्व रुपांतरणावर करंसी कन्वर्जन फॅक्टर असेसमेंट लागू होईल (जे सध्या 3.50%, इनसिग्निया क्रेडिट कार्ड साठी 1.5%, वर्ल्ड सफारी क्रेडिट कार्ड साठी 0% आहे). 09 ऑक्टोबर 2023 पासून प्रभावी, आंतरराष्ट्रीय ठिकाणी असलेल्या किंवा भारतात असून परंतु परदेशात नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडे भारतीय चलनात केलेल्या सर्व व्यवहारांवर सुद्धा मार्क फी लागू होईल. प्रत्येक उत्पादनासाठी मार्क फी ही विदेशी मुद्रा शुल्क सारखीच असेल.

(iii) कॅश ॲडव्हांस शुल्क

रोख रक्कम काढण्याचे शुल्क	रोख काढलेल्या रक्कमेच्या 2.5% (किमान ₹ 500/-)

कार्ड मेंबर भारतातील आणि/ किंवा परदेशातील कोणत्याही एटीएम मधून रोख रक्कम काढण्यासाठी क्रेडिट कार्ड वापरू शकतात जे त्या एटीएम मध्ये क्रेडिट कार्डच्या अनुरूपतेला अनुसरून आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे रोख रक्कम काढण्याचे शुल्क/ व्यवहार फी अशा सर्वच पैसे काढण्यांवर आकारले जातील आणि पुढील/ येत्या स्टेटमेंट मध्ये कार्ड मेंबरला त्याचे बिल लावले जाईल. व्यवहार शुल्क हे आरबीएल बँकेच्या एकमेव विवेकबुद्धीनुसार बदलाच्या अधीन आहे. पुढे, रोख रक्कम काढण्याच्या सर्व व्यवहारांवर रक्कम काढण्याच्या तारखेपासून ते संपूर्ण आणि अंतिम भरणा केल्याच्या तारखेपर्यंत (खाली दिल्याप्रमाणे) एक फायनांस शुल्क सुद्धा लागू होईल.

(iv) व्याज मुक्त कालावधी

क्रेडिट कार्डवर लागू होणाऱ्या योजनेनुसार व्याज मुक्त क्रेडिटचा कालावधी 20 ते 50 दिवसांच्या दरम्यान असू शकतो. मात्र, असा क्रेडिट कालावधी लागू होत नाही, जर मागील महिन्याची शिल्लक पूर्णपणे चुकती केलेली नाही किंवा कार्ड मेंबरने एटीएम मधून रोख रक्कम काढलेली आहे.

उदाहरण

जर ग्राहक 11/01/2019 रोजी एक किरकोळ व्यवहार करतो आणि त्याच्या आरबीएल बँक क्रेडिट कार्डाच्या स्टेटमेंटची तारीख 20/01/2019, आणि अंतिम देय दिनांक 09/02/2019 आहे. व्यवहाराच्या तारखेपासून ते अंतिम देय दिनांक पर्यंतच्या 30 दिवसांच्या कालावधीला व्याज मुक्त क्रेडिट कालावधी म्हटले जाते.

(v) रिव्हॉल्विंग क्रेडिट आणि कॅश ॲडव्हान्स दोन्हीसाठी फायनांस शुल्क

जेव्हा एक कार्ड मेंबर मागील बिलिंग स्टेटमेंट नुसार देय भरणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण शिल्लक रक्कमेचा भरणा करत नाही, तर थकीत रक्कम पूर्णपणे भरेपर्यंत अशा सर्व व्यवहारांवर मासिक टक्क्याच्या दराने वित्त शुल्क भरावे लागेल. या वित्त शुल्कांमध्ये (i) स्थगित वित्त शुल्काचा समावेश आहे जे पहिल्या चक्रामध्ये केलेल्या व्यवहारांवर आकारले जाते आणि या व्याज मोजणीचा कालावधी व्यवहाराच्या तारखेपासून व्याजमुक्त कालावधीतील पहिल्या विवरणाच्या बिलिंग तारखेपर्यंत असेल. (ii) वित्त शुल्क सुरुवातीच्या

शिल्लक आणि वर्तमान स्टेटमेंट चक्राच्या नवीन व्यवहारांवर आकारले जातात. पुढील स्टेटमेंटसाठी, हे शुल्क फक्त वित्त शुल्काच्या अंतर्गत एकत्रित केले जातील. एटीएम मधून काढलेल्या रोख रक्कमेवर सुद्धा, रोख रक्कम काढल्याच्या तारखेपासून ते पूर्णपणे भरणा करेपर्यंत, फायनांस शुल्क भरावे लागतात.

लागू होणारे फायनांश शुल्क

सुरक्षित क्रेडिट कार्ड	आरबीएल बँक क्रेडिट कार्ड साठी - 2.5% दरमहा किंवा 30% वार्षिक
	बजाज फिनसर्व आरबीएल बँक सुपरकार्ड्स साठी - 3.33% दरमहा किंवा 40% वार्षिक
इनसिग्निया क्रेडिट कार्ड	3.4% दरमहा किंवा 40.8% वार्षिक
इतर सर्व क्रेडिट कार्ड्स	3.99% दरमहा किंवा 47.88% वार्षिक पर्यंत*
डायल फोर कॅश लोन खाते	3.35% दरमहा किंवा 40.20% वार्षिक

इतर सर्व क्रेडिट कार्ड्सासाठी विभिन्न फायनांस शुल्क

श्रेणी A	3.35% दरमहा किंवा 40.20% वार्षिक
श्रेणी B	3.45% दरमहा किंवा 41.40% वार्षिक
श्रेणी C	3.65% दरमहा किंवा 43.80% वार्षिक

श्रेणी D	3.85% दरमहा किंवा 46.20% वार्षिक
श्रेणी E	3.99% दरमहा किंवा 47.88% वार्षिक

15 मे 2023 पासून प्रभावी, इतर सर्व क्रेडिट कार्डांवर खालीलप्रमाणे फायनांस शुल्क लागू होतील.

श्रेणी A	3.30% दरमहा किंवा 39.60% वार्षिक
श्रेणी B	3.75% दरमहा किंवा 45% वार्षिक
श्रेणी C	3.99% दरमहा किंवा 47.88% वार्षिक

*कमाल व्याज दर 3.99% दरमहा किंवा 47.88% वार्षिक आहे. आरबीएल बँक आपल्या एकमेव विवेकबुद्धीनुसार कार्ड मेंबरचा क्रेडिट स्कोअर, खर्च, मर्यादेचा वापर आणि देय भरणाच्या पद्धतीच्या आधारे क्रेडिट कार्डच्या आधारावर लागू होणाऱ्या वित्त शुल्कामध्ये बदल, सुधार आणि दुरुस्ती करू शकते. लागू होणाऱ्या फायनांश शुल्काच्या दरातील कोणताही बदल हा कार्ड मेंबरला त्यांच्या बिलिंग स्टेटमेंट मधून कळवण्यात येईल. जर कार्ड मेंबरला त्यांच्या क्रेडिट कार्डवर लागू होणाऱ्या व्याज दराविषयी जाणून घ्यायचे असल्यास, कार्ड मेंबरने आमच्या ग्राहक सेवेशी संपर्क करायला हवा (याचे तपशील नंतरच्या भागात दिलेले आहेत).

देय भरणाच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण देय रक्कमेचा भरणा न केल्यास फायनांस शुल्क आकारले जाईल. कोणतेही भरणा न केलेले ईएमआय आणि सर्व नवीन व्यवहारांसह (व्यवहाराच्या तारखेपासून) एकूण रक्कमेवर तो पर्यंत व्याज आकार जाईल जो पर्यंत आधीची थकीत रक्कम पूर्णपणे भरली जात नाही.

कार्ड मेंबरच्या वर्तमान थकीत शिल्लकेच्या आधारे, प्रत्येक दिवसाच्या शेवटी दररोजपणे व्याज मोजला जातो.

व्याज शुल्काच्या हिशोबाचे उदाहरण:

जर देय भरणाच्या शेवटच्या तारखेला शिल्लक रक्कमेचा फक्त काही भरणा केला गेला. स्टेटमेंटची तारीख दर महिन्याची दुसरी तारीख आहे, व्याजाची गणना पुढील पानावर स्पष्ट केली जाईल.

व्यवहार

तारीख	**व्यवहार**	**रक्कम**
12-12-2018	किराणा वस्तू खरेदी	₹ 6,000/-
26-12-2018	कपड्यांची खरेदी	₹ 4,000/-
02-01-2019	सभासदत्व फी	₹ 499/-
02-01-2019	जीएसटी	₹ 89.82/-
02-01-2019	स्टेटमेंटची तारीख	एकूण देय रक्कम = ₹ 10,588.82 किमान देय रक्कम = ₹ 1,088.82
10-01-2019	हॉटेल व्यवहार	₹ 4,000/-
15-01-2019	मोबाइल बिल भरणा	₹ 2,000/-
22-01-2019	क्रेडिट भरणा	₹ 1,088.82/-
02-02-2019	स्टेटमेंटची तारीख	एकूण देय रक्कम = ₹ 16,420.90 किमान देय रक्कम = ₹ 956.63

देय रक्कमेवर खाली दिल्याप्रमाणे व्याज आकारला जाईल: वार्षिक व्याज दर 47.88% आहे, ज्याचे रुपांतर 3.99% दरमहा होते. म्हणून दैनिक व्याज = थकीत रक्कम *(3.99%*12/ 365 दिवस).

व्याजाची गणना:

व्यवहाराची रक्कम	कालावधी	दिवसांची संख्या	रक्कम
₹ 6,000/-	12 डिसेंबर 2018 ते 01 जानेवारी 2019	21	165.28
₹ 4,000/-	26 डिसेंबर 2018 ते 01 जानेवारी 2019	7	36.73
₹ 6,000/-	02 जानेवारी 2019 ते 21 जानेवारी 2019	20	157.41
₹ 4,000/-	02 जानेवारी 2019 ते 21 जानेवारी 2019	20	104.94
₹ 4,000/-	10 जानेवारी 2019 ते 02 फेब्रुवारी 2019	24	125.93
₹ 2,000/-	15 जानेवारी 2019 ते 02 फेब्रुवारी 2019	19	49.85
1088.82/- चा भरणा समायोजित केल्यावर बाकी ₹ 9,500/- (₹ 588.82 जीएसटी आणि सभासदत्व फी भरणासाठी वापरले जातील)	22 जानेवारी 2019 ते 02 फेब्रुवारी 2019	12	149.54
		स्थगित वित्त शुल्क	202.01
		वित्त शुल्क	587.68
		जीएसटी	142.15
		एकूण वित्त शुल्क + जीएसटी	931.84

म्हणून आकारले जाणारे एकूण व्याज असेल: ₹ 931.84/- (लागू होणारे कर मिळून)

*व्याजाच्या रक्कमेवर लागू होणाऱ्या दरानुसार जीएसटी आकारला जाईल.

भरणा न केलेले शुल्क/देयके/कर व्याज आकारण्यासाठी/ चक्रवृद्धिसाठी भांडवलीकृत केले जाणार नाही.

(vi) उशीरा देय भरणाचे शुल्क

उशीरा देय भरणाचे शुल्क	**एकूण देय रक्कम (₹)**	**उशीरा देय भरणाची फी (₹)**
	₹ 100 पर्यंत	0
	₹ 100 पेक्षा अधिक	एकूण देय रक्कमेच्या 12.5% कमाल ₹ 1,300/-

***15 मे** 2023 पासून प्रभावी उशीरा देय भरणा शुल्क रचना खालीलप्रमाणे लागू होईल.

उशीरा देय भरणाची फी (₹)	
एकूण थकीत रक्कमेच्या 12.5%	
किमान ₹ 5/-	कमाल ₹ 1,300/-

उशीरा देय भरणाचे शुल्क/ लेट पेमेंट फी ("एलपीएफ") तेव्हा लागू होते जर कार्ड मेंबर द्वारे अंतिम तारखेला देय भरणा केला जात नाही किंवा किमान देय रक्कम ("एमएडी") पेक्षा कमी देय भरणा केला जातो.

(i) उदाहरण:
उशीरा देय भरणा शुल्क मोजण्याच्या तारखेला, जर निव्वळ भरणा (कोणताही भरणा उलट केल्यासह) किमान देय रक्कमेपेक्षा कमी आहे, तर थकीत रक्कमेवर उशीरा देय भरणा शुल्क आकारला जाईल. {थकीत रक्कम = स्टेटमेंटची एकूण देय रक्कम - निव्वण भरणा} विलंब शुल्क मोजण्याच्या तारखेच्या आधी केलेला सर्व भरणा थकीत रक्कमेच्या गणनेच्या दरम्यान ग्राह्य धरला जाईल.

उदा.

एलपीसी उदाहरण - निव्वळ भरणा < किमान देय		
तारीख	**इवेंट**	**रक्कम (₹)**
1 मे 2022	स्टेटमेंट तयार झाले	-
	एकूण देय रक्कम	9,800.00
	किमान देय	490.00

18 मे 2022	भरणा केला - 1	300.00
19 मे 2022	भरणा केला - 2	200.00
19 मे 2022	पेमेंट रिवर्सल	200.00
20 मे 2022	**भरणा देय दिनांक**	-
21 मे 2022	भरणा केला - 3	100.00
23 मे 2022	एलपीसी फक्त ₹ 9,400 च्या थकीत रक्कमेवर आकारले जाईल	1,175.00 + 18% जीएसटी

(ii) कार्डधारकाला प्राप्त झालेल्या सेल्स रिवर्सल किंवा परतावे सुद्धा थकीत रक्कम बदलतील. भरणा देय दिनांक (पीडीडी) पर्यंत प्राप्त झालेले सर्व परतावे स्टेटमेंटच्या एकूण देय रक्कमेतून वजा होतील. पीडीडी नंतर प्राप्त झालेले रिवर्सल/परतावे थकीत रक्कमेस प्रभावित करणार नाही.

उदा.

निव्वळ भरणा < किमान देय | देय तारखेच्या आधी परतावे आणि रिवर्सल		
तारीख	**इवेंट**	**रक्कम (₹)**
1 मे 2022	स्टेटमेंट तयार झाले	-
	एकूण देय रक्कम	9,800.00
	एकूण देय रक्कम	9,800.00
	किमान देय	490.00
18 मे 2022	भरणा केला	400.00
19 मे 2022	भरणा केला - 1	200.00
20 मे 2022	**भरणा देय दिनांक**	-
21 मे 2022	विक्री परतावा - 2	300.00
23 मे 2022	एलपीसी फक्त ₹ 9,200 च्या थकीत रक्कमेवर आकारले जाईल	1,150.00 + 18% GST

(iii) मागील चक्रात विवाद उपस्थित केलेले आणि वर्तमान चक्रात ग्राहकांच्या पक्षात सोडवलेले व्यवहार, विलंब फी मूल्यमापनासाठी ग्राह्य धरलेली थकीत रक्कम कमी करतील.वर्तमान चक्रात विवाद उपस्थित केलेले आणि जे ग्राहकांच्या पक्षात सोडवण्यात आलेले नाही, अशा व्यवहारांचा थकीत रक्कमेवर (ज्यांच्यावर विलंब फी मोजण्यात आलेली आहे) काहीही परिणाम होणार नाही.

(iv) ईएमआय रुपांतरण आणि रद्दीकरणाचा सुद्धा थकीत रक्कमेवर परिणाम होईल. मागील चक्रातील व्यवहारांचे ईएमआय रुपांतरण थकीत रक्कम कमी करतील, जेथे मागील चक्रातील व्यवहारांचे ईएमआय रद्दीकरण थकीत रक्कम वाढवतील ज्यावर विलंब फी मूल्यमापन केले गेले आहे.

उशीरा देय भरणाचे शुल्क फक्त तेव्हाच आकारले जाईल जेव्हा क्रेडिट कार्ड खात्यात तीन दिवसांपेक्षा अधिक काळ 'मागील देय' बाकी राहील. 'मागील देय दिवसांच्या' संख्या आणि उशीरा देय भरणाचे शुल्क, मात्र, भरणा देय दिनांकापासून मोजले जातील.

(vii) ओवरलिमिट फी / दंड

आंतरिक जोखिम धोरण आणि ग्राहकाच्या स्पष्ट संमतीच्या अधीन बँक काही व्यवहारांसाठी स्वीकृती देऊ शकते जे निर्धारित क्रेडिट मर्यादेपेक्षा वाढू शकतात. जर अशा ओवरलिमिट व्यवहारांमुळे थकीत रक्कम क्रेडिटच्या मर्यादेपेक्षा वाढते, तर 09 ऑक्टोबर 2023 पासून प्रभावी, ओवरलिमिट रक्कमेचे 2.5% किंवा ₹ 500, जे कोणतेही जास्त असतील, ओवरलिमिट फी म्हणून आकारले जातील.

जर फी, शुल्क किंवा व्याजाचा भरणा न केल्यामुळे कार्ड खाते ओवरलिमिट होते, तर ओवरलिमिट दंड आकारला जाईल.

ओवरलिमिट दंड (थकीत रक्कम क्रेडिटच्या मर्यादेपेक्षा अधिक झाल्यास आकारला जातो)	मर्यादेपेक्षा अधिक रक्कमेच्या 2.5% असून किमान ₹ 500 च्या अधीन आहे (09 ऑक्टोबर 2023 पासून प्रभावी)

(B) रोख रक्कम काढण्याची मर्यादा

(i) क्रेडिटची मर्यादा

तुमच्या सर्व कार्ड खात्यात वापरासाठी उपलब्ध क्रेडिटची मर्यादा आणि रोख रक्कम काढण्याची मर्यादा ही कार्ड डिलिवरीच्या वेळी कळवण्यात आलेली किमान निश्चित मर्यादा आहेत आणि या मासिक स्टेटमेंट्स मध्ये सुद्धा दर्शवण्यात आलेल्या आहेत. सर्व व्यवहार, फी, शुल्क मिळून तुमची एकूण थकबाकी ही या मर्यादेपेक्षा वाढली नाही पाहिजे. ॲड ऑन कार्ड मेंबरसाठी सुद्धा तितकीच मर्यादा आहे. जर कार्ड मेंबरने कार्डावरील एकूण क्रेडिट मर्यादेमध्ये काही कर्ज घेतलेले आहे, तर थकीत कर्जाची रक्कम सुद्धा एकूण क्रेडिटच्या मर्यादेतून कापण्यात येईल.

(ii) उपलब्ध क्रेडिटची मर्यादा

कोणत्याही क्षणी उपलब्ध क्रेडिटची मर्यादा ही निश्चित एकूण क्रेडिट मर्यादा आणि त्या क्षणी कार्डवर वापरलेल्या मर्यादेमधील फरक आहे. क्रेडिट आणि रोख रक्कमेची मर्यादा ही प्रत्येक कार्ड धारकासाठी वेगवेगळी असेल आणि कार्डधारकाला पाठवलेल्या मासिक स्टेटमेंट मध्ये उघड केली जाईल.

(iii) रोख रक्कम काढण्याची मर्यादा

(a) बँक तिच्या एकमेव विवेकबुद्धीनुसार तुमची क्रेडिट आणि रोख रक्कम काढण्याची मर्यादा निश्चित करेल आणि ती कार्ड कॅरियर आणि मासिक स्टेटमेंट्स मध्ये कळवेल. कार्ड खात्यात मंजूर करण्यात आलेल्या क्रेडिटची मर्यादा ही बँकेच्या पॉलिसीनुसार तपासणीच्या आधारे वेळोवेळी बदलले जाऊ शकते. एकूण क्रेडिटची मर्यादा आणि तुमच्या सर्व कार्ड खात्यांवर उपलब्ध क्रेडिटची मर्यादा ही स्टेटमेंट मध्ये दर्शवली जाते आणि तुमच्या सर्व ॲड ऑन कार्डांसह, तुमच्या सर्व कार्ड खात्यांमध्ये वापरासाठी उपलब्ध असते. कार्ड मर्यादा ओलांडलेल्या कोणत्याही परवानगीचा सन्मान न करण्यासाठी बँकेवर बंधन असेल.

(b) तुमचे कार्ड रद्द झाल्यास क्रेडिटची मर्यादा आणि कार्ड खाते संपुष्टात येईल.

(c) जर तुम्ही मासिक स्टेटमेंट नुसार देय रक्कमेपेक्षा जास्तीची रक्कम भरणा केली, तर तुम्हाला क्रेडिटच्या

शिल्लकेवरील व्याज देण्यात येणार नाही आणि हे पुढील मासिक स्टेटमेंट्स मधील देय रक्केमध्ये समायोजित करण्यात येईल.

(C) बिलिंग

(i) बिलिंग स्टेटमेंट्स

आरबीएल बँक कार्ड मेंबरच्या नोंदणीकृत ईमेल अॅड्रेस किंवा पत्र व्यवहाराच्या पत्त्यावर मासिक स्टेटमेंट पाठवेल, ज्यामध्ये शेवटच्या स्टेटमेंटच्या तारखेपासून कार्ड मेंबरच्या खात्यात केलेल्या जमा देय भरणा आणि खात्यातून कापलेल्या व्यवहारांचे तपशील असते.

कार्ड मेंबरला सल्ला आहे कि सर्व क्रेडिट कार्ड स्टेटमेंट नियमितपणे वेळेवर मिळण्यासाठी, कार्ड मेंबरच्या संपर्काच्या पत्त्यामध्ये काही बदल झाल्यास, त्यांनी त्वरित आरबीएल बँकेला संपर्क करावा.

(ii) किमान देय रक्कम

किमान देय रक्कम किंवा एमएडी ही किमान रक्कम आहे जी तुम्ही तुमचे कार्ड खाते चांगल्या क्रेडिट स्थितीमध्ये ठेवण्यासाठी भरणे तुम्हाला आवश्यक आहे. एकूण जीएसटी + वर्तमान महिन्याचे ईएमआय डेबिट्स + 100% फी/शुल्क + [((किरकोळ खर्च, रोख रक्कम, व्याज) ची 5%) किंवा ₹ 200 पैकी जास्त असेल ती] + आधी भरणान न केलेले एमएडी (कोणतेही असल्यास) यांच्या बेरीज म्हणून एमएडी मोजली जाते. सर्व कार्डांसाठी, फक्त प्लॅटिनम अॅडवांटेज सुपरकार्ड वगळून, ज्यासाठी 20% आहे. जर कार्ड मेंबर एकूण देय रक्कम किंवा किमान देय रक्कमेचा काही भाग भरतात (कोणत्याही परिस्थितीमध्ये एमएडी पेक्षा कमी नाही), तर भरणा करायची उर्वरित थकीत रक्कम ही नंतरच्या स्टेटमेंट्स मध्ये जोडण्यात येईल. यावर संपूर्ण आणि अंतिम देय भरणेच्या तारखेपर्यंत फायनांस शुल्क आकारला जाईल. कमीत कमी एमएडीची भरणा प्राप्त न झाल्यास, ब्यूरोकडे खाते कर्तव्यचुकार म्हणून कळवण्यात येईल.

कृपया लक्षात घ्या दर महिन्याला फक्त किमान देय रक्कम भरणा केल्याने परिणामी कार्ड सदस्याच्या

थकीत शिल्लकेवर व्याज भरणा सह परतफेड दीर्घकाळ पर्यंत लांबवली जाईल.

उदाहरण: जर एक कार्ड मेंबर ₹ 5,000/- खर्च करतो आणि दर महिन्याला नेमकी किमान देय रक्कम भरतो, तर यामुळे थक्कीत रक्कमेवर परिणामी व्याज भरणा सह 6 वर्षांपर्यंत परतफेड लांबवली जाते. म्हणून, जेव्हा कधीही रोख प्रवाह संभव होतो, कार्ड मेंबरने फक्त किमान देय रक्कमेपेक्षा बऱ्याच प्रमाणात जास्त परत फेड करायला हवी.

आरबीएल बँक, तिच्या विवेकबुद्धीनुसार, कोणत्याही क्षणी, पूर्वसूचना न देता, कोणत्याही कार्ड मेंबरच्या संबंधात, वरील कलमांमध्ये वर्णन केल्याप्रमाणे फक्त एमएडी भरण्याचा पर्याय मागे घेऊ शकते. जोपर्यंत आरबीएल बँकेद्वारे अन्यथा सहमती दिली जात नाही, खाली दिलेल्या क्रमाने स्पष्ट केलेल्या रक्कमेच्या विरुद्ध कार्ड मेंबरकडून प्राप्त झालेला कोणताही भरणा (एनपीए खात्यातील वसूली सह पात्र नाही):

(i) कर

(ii) ईएमआय

(iii) फी आणि शुल्क

(iv) व्याज शुल्क:

(v) किरकोळ खरेदी आणि रोख रक्कम काढल्या प्रति देयके;

येथे वर काहीही समाविष्ट असूनही: (i) आरबीएल बँक, आपल्या विवेकबुद्धीनुसार, कार्ड मेंबर द्वारे आरबीएल बँकेकडून घेतलेल्या इतर सुविधांच्या संबंधात कार्ड मेंबर द्वारे देय असलेल्या शिल्लक देय रक्कम, जर कोणतीही आहे, प्रति असे देयकाचे विनियोग करू शकते; (ii) विनियोगाच्या क्रमामध्ये आरबीएल बँकेद्वारे तिच्या विवेकबुद्धीनुसार बदल केला जाऊ शकतो. अशा विनियोगानंतर उर्वरित अतिरिक्त रक्कम, जर असेल तर, त्या रकमेच्या विरूद्ध विनियोगित केले जाऊ शकते, जी आरबीएल बँकेद्वारे तयार करण्यात येणाऱ्या लगेचच्या पुढील स्टेटमेंट मध्ये नमूद केली जाणे आहे.

(iii) देय भरणाची पद्धत

खालीलपैकी कोणत्याही एक पद्धतीने कार्ड खात्यात भरणा केला जाऊ शकतो:

(A) एकदाच भरणा करून:

भरणा करण्यासाठी सोयिस्कर पद्धती

ऑनलाइन कार्ड भरणा

- rblbank.com वर भेट देऊन 'लॉगइन' वर क्लिक करा त्यानंतर 'क्रेडिट कार्ड' खाली 'ऑनलाइन कार्ड पेमेंट (क्विक बिल पे)' वर क्लिक करा किंवा
- लगेचच ॲक्सेससाठी खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करा:

एनईएफटी भरणा

एनईएफटी ट्रांसफर सुरु करण्यासाठी पेयी म्हणून तुमचे आरबीएल क्रेडिट कार्ड नमूद करा.
पेयीचे नाव: कार्डवरील नाव
पेयी खाते क्रमांक: क्रेडिट कार्ड क्रमांक
बँकेचे नाव: आरबीएल बँक
आयएफसी कोड: RATNØCRCARD
खाते ठिकाण: एनओसी, गोरेगाव, मुंबई

आरबीएल मायकार्ड मोबाइल ॲप वापरुन

आरबीएल मायकार्ड मोबाइल ॲप द्वारे भरणा सुरु करा.

डाउनलोड करण्यासाठी 5607011 वर MyCard एसएमएस करा.

चेक वापरून

- तुमच्या नजीकच्या आरबीएल बँक शाखेमध्ये RBL Bank Card <16 Digit Card No.> च्या नावाने तुमचा चेक टाका
- त्याचप्रमाणे, तुम्ही या पत्त्यावर चेक पाठवू शकता:
  आरबीएल बँक लिमिटेड, युनिट: 306-311, तिसरा मजला, जेएमडी मेगापोलिस, सोहना रोड, सेक्टर - 48, गुरगाव - 122 018, हरियाणा.

तुमच्या कार्डचा भरणा करण्याविषयी आणखी तपशीलासाठी rblbank.com वर भेट द्या.

(B) नियतकालिक भरणांद्वारे:

कार्ड मेंबर त्यांच्या क्रेडिट कार्ड वर स्टँडिंग इंस्ट्रक्शन (एसआय)/ नॅशनल ऑटोमेटेड क्लीयरिंग हाउस (एनएसीएच) सुद्धा निवडू शकतात. एसआय/ एनएसीएच हे एकूण देय रक्कम (टीएडी) किंवा किमान देय रक्कम (एमएडी) साठी असू शकते. हे लक्षात घेतले जाऊ शकते की एसआय/ एनएसीएच अंमलबजावणीसाठी लागू असलेली रक्कम ही अंतिम देय तारखेच्या आधी कामकाजी दिवसापर्यंतच्या बिल/ शेवटच्या स्टेटमेंटनंतर खात्यात प्राप्त झालेल्या जमा (ग्राहकाने सुरु केलेले भरणा, मर्चंटकडून परतावा, रिवॉर्ड रीडम्प्शन क्रेडिट/ कॅशबॅक, शुल्क परतावा, इत्यादी जर कोणतेही आहेत)

आणि खर्च (भरणा परतावा) साठी हिशेब आहे. एसआय/ एनएसीएच अंमलबजावणी या तर्कावर काम करते कि एमएडी किंवा टीएडी आणि क्रेडिट मधील फरकावर अंमलबजावणी केली जाईल.

एसआय अंमलबजावणीची रक्कम ठरवण्यात ग्राहकाद्वारे सुरु केलेला भरणा मुख्य भूमिका निभावतो.

- जर एकूण देय रक्कम आणि क्रेडिट/ डेबिटची निव्वळ रक्कम (ज्यामध्ये भरणा आहे) ही एकूण देय रक्कमेच्या समान किंवा कमी असेल, तर किमान देय रक्कम आणि मिळालेल्या भरणा च्या निव्वळ फरकासाठी एसआय/एनएसीएच अंमलात येईल, जर यामधील फरक ₹. शून्य पेक्षा जास्त आहे.

एनएसीएच/ एसआय द्वारे भरणाच्या बाबतीत, जर पैसे भरण्याची अंतिम तारीख सुट्टीचा दिवस असेल, तर एनएसीएच/ एसआय हे आदल्या कामकाजाच्या दिवशी सादर केले जाईल. पैसे भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंत निधी प्राप्तीची खात्री करण्यासाठी चेक द्वारे भरणा हा कमीत कमी 3 दिवस आधीच करायला हवा.

जर पैसे भरणाची सूचना (एनएसीएच/ एसआय) ही एमएडी साठी आहे तर -

पैसे भरणा सुचनेचा प्रकार	परिदृश्य	टीएडी	एमएडी	ग्राहकाद्वारे सुरु केलेला भरणा	एसआय/ एनएसीएच अंमलबजावणी
एमएडी	A	2,000	200	0 (भरणा नाही)	200
एमएडी	B	2,000	200	100 (भरणा < एमएडी)	100
एमएडी	C	2,000	200	200 (भरणा = एमएडी)	0
एमएडी	D	2,000	200	400	0
एमएडी	E	2,000	200	1,600	0
एमएडी	F	2,000	200	1,900	0
एमएडी	G	2,000	200	>=2,000	0

जर पैसे भरणाची सूचना (एनएसीएच/ एसआय) ही टीएडी साठी आहे तर -

पैसे भरणा सुचनेचा प्रकार	परिदृश्य	टीएडी	एमएडी	ग्राहकादवारे सुरु केलेला भरणा	एसआय/ ईसीएस अमलबजावणी रक्कम
टीएडी	A	2,000	200	0 (भरणा नाही)	2,000
टीएडी	B	2,000	200	500 (भरणा < एमएडी)	1,500
टीएडी	C	2,000	200	1,500 (भरणा = एमएडी)	500
टीएडी	D	2,000	200	>=2,000	0

कृपया लक्षात घ्या: जर कार्ड मेंबरचा अनिवासी भारतीय (एनआरआय) दर्जा आहे, तर त्यांनी खात्री करायला हवी की त्यांच्या क्रेडिट कार्ड खात्यात होणारे सर्व भरणा हे त्यांच्या अनिवासी बँकिंग खात्यातून होणे आवश्यक आहेत. इतर कोणत्याही पद्धतीने भरणा करणे आरबीआय मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन मानले जाईल आणि आरबीएल बँक ताबडतोब आणि, नोटीसशिवाय कार्ड ब्लॉक किंवा बंद करण्याचा संपूर्ण अधिकार राखून ठेवते. कृपया आणखी तपशीलासाठी कार्ड मेंबर च्या अटी आणि नियम पाहा.

(iv) बिल विवादांचे उपाय

जर कार्ड मेंबर स्टेटमेंट मध्ये दर्शवलेल्या शुल्कांशी असहमत असेल, तर हे स्टेटमेंट मिळाल्याच्या 30 दिवसांच्या आत लिखित स्वरुपात आरबीएल बँकेला कळवायला हवे ज्यानंतर असे समजण्यात येऊ शकते कि स्टेटमेंटमध्ये दर्शवलेले सर्व शुल्क क्रमाने आहेत. कार्ड मेंबर सही केलेला डिस्प्युट फॉर्म आरबीएल बँकेला ईमेल करू किंवा पाठवू शकतो जो आमची वेबसाइट (https://rblbank.com/download-forms/credit-cards) वर उपलब्ध आहे.

जर उपरोक्त विसंगती बँकेला प्रथमदर्शनी योग्य वाटली, तर बँक तात्पुरत्या आधारावर शुल्क तोपर्यंत मागे घेऊ

शकते जोपर्यंत बँकेद्वारे त्यानंतरचा तपास पूर्ण आणि अंतिम समाधानापर्यंत पूर्ण होत नाही. जर बँकेद्वारे केलेली उल्लेखित तपासणी दर्शवते कि अशा (विसंगति) शुल्काची जबाबदारी उल्लेखित कार्ड मेंबरकडेच जाते, तर हे शुल्क नंतरच्या स्टेटमेंट मध्ये पुन्हा सादर करण्यात येतील आणि इथे वर दर्शवलेल्या शुल्कांप्रमाणे बँकेद्वारे फी/शुल्काचा दावा केला जाईल. तरीसुद्धा इथे दिलेल्या तरतूदींनुसार, बँकेद्वारे केलेल्या तपासणींच्या परिणामांविषयी कार्ड मेंबरला कळवण्यासाठी बँक 60 दिवसांपेक्षा अधिक कालावधी वाढवणार नाही. "फसवणूक" म्हणून विवादित व्यवहारांसाठी, विवाद सोडवला जाईपर्यंत कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही आणि क्रेडिट ब्यूरोला कळवणे बँकेद्वारे थांबवले जाईल.

तक्रार निवारण प्रक्रिया

कार्ड मेंबर कोणत्याही चौकशी आणि/ किंवा समस्येच्या निवारणासाठी खालीलपैकी कोणत्याही संपर्काच्या माध्यमाने बँकेला संपर्क करू शकता.

पातळी-I:

तुम्ही आमच्या ग्राहक सेवा क्रमां **022-6232 7777** वर आम्हाला कॉल करू शकता किंवा **cardservices@rblbank.com.** वर आम्हाला ईमेल करू शकता. बजाज फिनसर्व आरबीएल बँक सुपरकार्ड्स साठी **022-7119 0900** वर कॉल करा किंवा **supercardservice@rblbank.com** वर आम्हाला ईमेल करा.

किंवा तुम्ही तुमच्या कार्ड नंबर तपशीलासह खालील पत्त्यावर आम्हाला लिहू शकता: कार्ड सर्विसेस, आरबीएल बँक लिमिटेड, युनिट 306-311, तिसरा मजला, जेएमडी मेगापोलिस, सोहना रोड, सेक्टर - 48, गुरुग्राम, हरियाणा - 122018.

तुमच्या चौकशीच्या स्वरुप आणि समाधान आणि संपर्कासाठी लागणाऱ्या वेळेच्या आधारे तुमचे पत्र किंवा ईमेल मिळाल्याच्या 10 दिवसांच्या आत आम्ही तुम्हाला उत्तर देऊ. तुमची समस्या सोडवण्यात आम्हाला मदत करण्यासाठी आम्हाला लिहिताना कृपया खालील तपशील आम्हाला द्या.

1. तुमचे संपूर्ण नाव
2. तुमच्या संपर्काचे तपशील (पत्ता, टेलिफोन क्रमांक आणि ईमेल)

तुमच्या खाते क्रमांक/ क्रेडिट कार्ड क्रमांकासोबत तुमच्या आधीच्या संभाषणामध्ये तुम्हाला देण्यात आलेला संदर्भ क्रमांक नमूद करा जेणेकरून तुमची समस्या समजण्यात आणि सोडवण्यात आम्हाला मदत होईल.

पातळी-II:
जर तुम्हाला देण्यात आलेल्या उपायाने तुम्ही समाधानी नाही, तर तुम्ही आम्हाला **headcardservice@rblbank.com**. वर ईमेल करू शकता. यामध्ये तुमचा कार्ड नंबर आणि पातळी 1 वर दिलेला संदर्भ क्रमांक नमूद करा. 10 दिवसांच्या आत तुम्हाला उत्तर देण्यात येईल.

तुम्ही या पत्त्यावर हेड क्रेडिट कार्ड सर्विससेना लिहू शकता - हेड - कार्ड सर्विसेस, आरबीएल बँक लिमिटेड, कार्ड्स ऑपरेटिंग सेंटर – सीओसी, जेएमडी मेगापोलिस, युनिट नंबर 306-311, तिसरा मजला, सोहना रोड, सेक्टर 48, गुरगाव, हरियाणा - 122018

पातळी-III:
जर तुम्हाला देण्यात आलेल्या उपायाने तुम्ही अजूनही समाधानी नाही किंवा 10 दिवसांच्या आत तुम्हाला काहीही प्रतिसाद मिळाला, तर तुम्ही खालील पत्त्यावर प्रमुख नोडल अधिकारी, श्री. विकास निगम यांना संपर्क करू शकता -:
प्रति,

प्रमुख नोडल अधिकारी, आरबीएल बँक - श्री. विकास निगम - 022-71432700 वर कॉल करा - टपाल पत्ता: आरबीएल बँक जेएमडी मेगापोलिस, युनिट नंबर. 306-11, तिसरा मजला, सोहना रोड, सेक्टर 48, गुरगाव, हरियाणा - 122018. principalnodalofficer@rblbank.com

आमचे प्रमुख नोडल ऑफिसर 10 दिवसात तुमच्या समाधानानुसार समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतील. तक्रारीची तपासणी करण्यासाठी अधिक वेळ लागल्यास, प्रतिसाद देण्यासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे स्पष्ट करून तक्रार मान्य केली जाईल.

पातळी-IV:

जर प्रमुख नोडल अधिकाऱ्यांकडून मिळालेले उत्तर तुमची तक्रार सोडवू शकले नाही किंवा 10 दिवसात तुम्हाला प्रमुख नोडल अधिकाऱ्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, तर तुम्ही रिझर्व बँक अंतर्भूत लोकपाल योजना, 2021 (आरबीआयओएस, 2021) च्या तरतूदीच्या अंतर्गत रिझर्व बँक अंतर्भूत लोकपालला पत्र लिहू शकता.

रिझर्व बँक अंतर्भूत लोकपाल विषयी अधिक तपशीलांसाठी कृपया rblbank.com/banking-ombudsman वर भेट द्या.

आरबीएल बँक क्रेडिट कार्ड्सची ग्राहक भरपाई धोरण तुम्ही rblbank.com/pdf-pages/bank-policies वर पाहू शकता.

(D) पैसे भरण्यात कसूर आणि परिस्थिती

(i) एक कार्डधारकास बाकीदार म्हणून रिपोर्ट करण्यासाठी सूचना कालावधी सह प्रक्रिया

भरणा करण्यात कसूर केल्यास, क्रेडिट कार्ड खात्यातील कोणत्याही थकीत रक्कमेच्या पूर्ततेसाठी खालीलपैकी कोणतेही माध्यम वापरून कार्ड मेंबरला स्मरणपत्रे/ रिमाइंडर्स पाठवले जातील: टपाल, टेलिफोन, ई-मेल, एसएमएस मेसेजिंग द्वारे आणि/ किंवा आठवण करून देण्यासाठी, पाठपुराव्यासाठी आणि देय रक्कम गोळा करण्यासाठी तिसऱ्या पक्षास कामावर ठेवून. असे नियुक्त करण्यात आलेला कोणताही तिसरा पक्ष, कर्ज वसूलीच्या आणि वेळोवेळी लागू होणाऱ्या मार्गदर्शक तत्वांचे पूर्णपणे पालन करेल. खालीलपैकी एक किंवा अधिक घटनांच्या प्रसंगामुळे कसूर ठरले जाऊ शकता आणि आरबीएल बँक तिच्या विवेकबुद्धीनुसार क्रेडिट कार्ड सुविधा रद्द करू शकते. पैसे भरण्यात कसूरच्या घटना खालीलप्रमाणे आहेत:

a. कार्ड मेंबर 180 दिवसांच्या निर्धारित कालावधी मध्ये बँकेला कोणतीही देय रक्कम भरणा करण्यात सतत अयशस्वी;

b. कार्ड मेंबर कार्ड मेंबर करारानुसार जबाबदारी पूर्ण करण्यास अयशस्वी ठरतात;

c. बँकेला पाठवण्यात आलेले कोणतेही चेक आणि/ किंवा एनएसीएच/ स्टँडिंग इंस्ट्रक्शन्स सादर केल्यावर/ केले जात असताना कोणत्याही कारणास्तव वितरित केले जात नाही/ कारवाई होत नाही.

d. कार्ड मेंबरने केलेले कोणतेही सादरीकरण चुकीचे, खोटे किंवा अपूर्ण असल्याचे सिद्ध होते, ज्यामध्ये बँकेला सादर केलेले उत्पन्न आणि/किंवा ओळखपत्रे/कागदपत्रे चुकीची, अपूर्ण, किंवा खोटी फसवी माहिती असलेली आहेत परंतु हे इतकेच मर्यादित नाही.

(ii) पैसे भरण्यात कसूरचा रिपोर्ट मागे घेण्याची प्रक्रिया आणि कालावधी ज्यामध्ये बाकी रक्कम चुकती केल्यानंतर कसूरचा रिपोर्ट मागे घेण्यात येईल:

a. वादातीत डिफॉल्टरने त्याचे संपूर्ण शिल्लक देय रक्कम बँकेला चुकती केली आहे किंवा बँकेसोबत त्यांची देय रक्कम भरली आहे.

b. बँकेद्वारे किंवा विरोधात सादर करण्यात आलेल्या कायदेशीर खटल्यात, बँकेच्या विरोधात निकाल लागला आहे, ज्यात बँकेला कार्ड मेंबरला डिफॉल्ट रिपोर्ट मधून वगळण्याची सूचना करण्यात आली आहे. स्वतंत्र तपासणीनंतर प्रत्येक बाबतीत निर्णय घेतले जातात.

(iii) पैसे भरण्यात कसूर केल्यावर वसूलीची प्रक्रिया:

पैसे भरण्यात कसूर केल्यास, वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार लवाद आणि समन्वय अधिनियम, 1996 च्या तरतूदींच्या अंतर्गत बँकेच्या नियुक्त अधिकाऱ्यानुसार नियुक्त केलेल्या एकमेव लवादाकडे विवाद नमूद करून बँक रक्कम वसूल करू शकते. लवादाची बैठक दिल्ली, भारत असेल.

लवादाचे कामकाज इंग्रजी भाषेमध्ये असेeकोणतीही वार्षिक फी आणि/किंवा इतर शुल्कांचा प्रो-रेटा आधारे परतावा मिळणार नाही.

(iv) कार्डधारकाच्या मृत्यू/ कायमस्वरुपी अक्षमतेच्या बाबतीत थकबाकीची वसूली:

कार्ड मेंबरच्या मृत्यू किंवा कामयस्वरुपी अक्षमतेच्या बाबतीत, बँक कार्ड मेंबरच्या कायदेशीर उत्तराधिकारी कडून थकबाकीची रक्कम वसूल करण्याचा आणि खात्यातील थकबाकी सौहार्दपणे चूकती करण्याचा प्रयत्न करेल.

(v) कार्ड धारकासाठी उपलब्ध विमा सुरक्षा आणि पॉलिसी सुरु होण्याची तारीख:

क्रेडिट कार्ड मध्ये कार्ड मेंबर/ ग्राहकासाठी एक विमा पॉलिसी उपलब्ध आहे जी कार्ड मेंबर कराराच्या अटी आणि नियमांमध्ये नमूद केलेली आहे. पॉलिसी बँकेला झालेल्या नुकसानीचा अहवाल देण्यापूर्वी 1 दिवसाच्या आधी आणि बँकेला झालेल्या नुकसानीची नोंद केल्याच्या 7 दिवसांनंतर होणारे नुकसान समाविष्ट करते. हा दावा शक्य तितक्या लवकर बँकेला कळवायचा आहे.

(E) कार्ड सभासदत्वाची समाप्ती/ रद्द/ प्रत्यार्पण करणे

(i) कार्ड मेंबर द्वारे कार्डच्या प्रत्यार्पण करण्याची प्रक्रिया

(a) कार्ड मेंबर कोणत्याही वेळी सर्व क्रेडिट चुंबकीय पट्टीवरून तिरपे अर्धे कापून ते बँकेला परत करून, क्रेडिट कार्डशी संबंधित सर्व सुविधा आणि लाभ समाप्त करण्याची विनंती करून एकतर लिखित स्वरुपात किंवा बँकेच्या 24 तास ग्राहक सेवा हेल्पलाइनला कॉल करून, कार्ड खाते समाप्त करण्याची निवड करू शकतात. प्राथमिक कार्ड मेंबर बँकेला लिखित स्वरुपात कळवून अँडिशनल कार्डचा वापर रद्द करू शकतात, परंतु तरीही, अँडिशनल क्रेडिट कार्ड च्या वापराद्वारे झालेल्या सर्व शुल्कांसाठी प्राथमिक कार्ड मेंबर जबाबदार राहील. कोणतीही वार्षिक फी आणि/किंवा इतर शुल्कांचा प्रो-रेटा आधारे परतावा मिळणार नाही.

(ii) आरबीएल बँकेद्वारे समाप्ती/ रद्द करणे

a. बँक तिच्या विवेकबुद्धीनुसार कोणत्याही क्षणी क्रेडिट कार्ड सुविधा त्वरित समाप्त करू शकते किंवा कोणतेही कारण किंवा हेतू न देता आणि कोणत्याही सूचनेशिवाय कोणत्याही क्षणी वापर प्रतिबंधित करू शकते. जेथे बँक क्रेडिट कार्ड सुविधा समाप्त करते, कार्ड खात्यातील सर्व थकबाकी ही देय रक्कम होईल आणि त्वरित भरणा करावी लागेल (यामध्ये अजूनही न कापले गेलेल्या शुल्क किंवा कॅश अॅडवांसेसचा समावेश आहे). बँक सर्व आस्थापनांना (जेथे क्रेडिट कार्ड वैध आहे/ स्वीकारले जाते) रद्द केलेल्या क्रेडिट कार्डाविषयी कळवेल. जर क्रेडिट कार्ड रद्द केले जाते, तर कार्ड मेंबरने हे तिरपे अर्धे कापायला हवे आणि दोन्ही अर्धे भाग लगेचच बँकेला परत करायला

हवे. प्रो-रेटा आधारे कोणतेही वार्षिक शुल्क किंवा इतर चार्जेसचा परतावा मिळणार नाही.

b. अशा प्रसंगी जेव्हा कार्ड मेंबर त्याची/ तिची नोकरी, व्यवसाय किंवा पत्ता बदलतो/ बदलते, किंवा त्याची/ तिची नेमणूकीच्या सध्याच्या ठिकाणाहून बदली केली जाते, किंवा त्याचे/ तिचे सॅलरी अकाउंट/ मुख्य बँक खाते इत्यादी बदलते (जसा प्रसंग असेल तसा), बँकेला तिच्या विवेकबुद्धीनुसार क्रेडिट कार्ड सुविधा बंद करण्याचा अधिकार असेल. कार्ड मेंबर विशेषपणे मान्य करतो/ करते की एकदा क्रेडिट कार्ड खाते रद्द/ बंद झाल्यावर, क्रेडिट कार्डचे विशेषाधिकार (सर्व फायदे आणि सेवांसह) मागे घेण्यात येतील, आणि अशा विशेषाधिकारांची पुनर्निर्मिती स्वयंचलित नाही आणि केवळ बँकेच्या विवेकबुद्धीनुसार होईल. क्रेडिट कार्ड रद्द केल्यावर (ज्या कोणत्याही कारणासाठी), कार्ड मेंबर:

• ने क्रेडिट कार्ड वापरू नये, कार्ड तिरपे अर्धे कापून, ते बँकेला परत करायचे आहे.

• कार्डच्या कोणत्याही वापसासाठी जबाबदार आहे ज्यामध्ये कार्ड अर्ध्यातून तिरपे कापून बँकेला परत केले जाईपर्यंत शुल्कांच्या भरणाचा समावेश आहे

• क्रेडिट कार्डच्या वापराच्या नियमांनुसार बँकेला देय भरणा करणे सुरु ठेवायला हवे.

c. जर कार्ड मेंबरचे क्रेडिट कार्ड कधीच वापरले नाही किंवा 90 दिवसांसाठी वापरले नाही, तर यामुळे बँकेद्वारे फायदे रद्द केले जाऊ शकतात.

d. आरबीआय मार्गदर्शक तत्वांनुसार दीर्घ काळपर्यंत निष्क्रियतेमुळे कार्डची समाप्ती, 1 वर्षाच्या कालावधीसाठी क्रेडिट कार्ड न वापरल्यास क्रेडिट कार्ड कायमस्वरुपी बंद करण्यात येईल. 1 वर्षापेक्षा जास्त काळ निष्क्रिय राहिल्यास, 30 दिवसांच्या नोटीस कालावधीच्या शेवटी कार्ड कायमस्वरूपी बंद होण्यापूर्वी बँक प्रतिसाद/उत्तर देण्यासाठी 30 दिवसांची नोटीस पाठवेल.

(F) कार्ड हरवणे/ चोरी/ गैरवापर

(i) कार्ड हरवल्यास/ चोरीला गेल्यास/ गैरवापर झाल्यास पालन करायची प्रक्रिया - कार्ड जारी करणाऱ्यांना कळवण्याचे माध्यम

क्रेडिट कार्ड हरवल्यास, चोरीला गेल्यास, न मिळाल्यास, आरबीएल बँक किंवा इतर कोणत्याही बँकेच्या एटीएममध्ये अडकल्यास किंवा त्यांच्या संबंधित परवानगी शिवाय त्याचा गैरवापर होत असल्यास कार्ड मेंबरने 24 तासांच्या टोल फ्री क्रमांकावर ग्राहक सेवेला कॉल करून त्वरित आरबीएल बँकेला कळवले पाहिजे. याव्यतिरिक्त, हरवल्यास, चोरी, गैरवापर झाल्यास, कार्ड मेंबरने पोलिस तक्रार/ प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करणे आवश्यक आहे, ज्याची एक प्रत बँकेला पाठवायची आहे.

(ii) वरील बाबतीत कार्ड मेंबरची जबाबदारी

a. बँकेला सूचना देण्यापूर्वी/ कळवण्यापूर्वी क्रेडिट कार्डाच्या कोणत्याही अनधिकृत वापरामुळे उद्भवलेल्या कार्ड मेंबरचे खर्च बँकेला सूचना येईपर्यंत झालेल्या सर्व शुल्कामध्ये समविष्ट असेल आणि बँकेला सूचना मिळाल्यानंतरच ते "शून्य" होतील.

b. विवादित व्यवहाराच्या चौकशी दरम्यान कार्ड मेंबर बँक, बँकेचे प्रतिनिधी आणि/ किंवा कायदेशीर अधिकाऱ्यांना पूर्णपणे सहकार्य करेल.

c. जर (चोरीची तक्रार केल्यानंतर) कार्ड मेंबरला नंतर क्रेडिट कार्ड सापडते, तर सापडलेले क्रेडिट कार्ड वापरले जाऊ नये आणि ते अर्ध्यामध्ये कापून ताबडतोब बँकेला परत केले गेले पाहिजे.

(G) अस्वीकृती

आरबीएल बँक कार्ड मेंबरचा परतफेडीचा इतिहास इत्यादी बद्दलची सर्व उपलब्ध माहिती क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो किंवा कायद्याने मंजूर केलेल्या अशा इतर एजन्सींना देईल. आरबीएल बँकेकडे, छायाचित्रांसह, प्रदान केलेले अर्ज आणि कागदपत्रे ठेवण्याचा अधिकार आहे आणि ते परत करणार नाही.

a. कार्ड मेंबर या द्वारे, क्रेडिट पडताळणी किंवा शिफारसीच्या तपासणीच्या उद्देश्यासाठी किंवा त्यांच्या हिताच्या सुरक्षेसाठी कार्ड मेंबरशी संबंधित सर्वच/ कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे उघड करण्याचे, ज्यामध्ये हा करार आणि/ किंवा इतर कोणतेही करार समाविष्ट आहे, किंवा भारतीय रिझर्व्ह बँक, आय कर विभाग, न्यायसभा, न्यायालय, न्यायिक संस्था, इतर बँक, क्रेडिट ब्यूरो, आर्थिक संस्था किंवा इतर कोणत्याही तिसऱ्या पक्षासोबत कार्ड मेंबर द्वारे केलेले पैसे भरण्यातील कसूर उघड करण्याचे, वेळोवेळी लागू होत असेल त्यानुसार प्रगटीकरण नियमांना अनुसरून बँकेला स्पष्टपणे अधिकार देतो.

b. कार्ड मेंबर या द्वारे सहमत आहे कि, फक्त कार्ड मेंबर द्वारे दिलेल्या सुस्पष्ट संमतीच्या बाबतीत, क्रेडिट कार्ड अर्जामध्ये किंवा इतर प्रकारे कार्ड मेंबर द्वारे भरलेली माहिती पुढे बँकेद्वारे कार्ड संबंधित ऑफर्सच्या विक्रीकरीता मार्केटिंगच्या उद्देश्यासाठी वेळोवेळी वापरली जाऊ शकते, ज्यामध्ये बॅलेन्स ट्रांसफर, ईएमआय ऑफर्स, रोख संदर्भातील ऑफर्स आणि इंशुरन्स प्रोडक्ट्सचा समावेश आहे, परंतु हे इतकेच मर्यादित नाही. पुढे, लागू होणाऱ्या प्रगटीकरण नियमांना अनुसरून, बँक ही माहिती वेळोवेळी बँकेच्या इतर प्रोडक्ट्सच्या जाहिरातीसाठी वापरू शकते. याची खात्री करण्यासाठी की कार्ड मेंबर (मेंबर्स) ना असुविधा झालेली नाही, बँक "डू नॉट कॉल" (कॉल करू नका) रजिस्टर सांभाळते आणि जर कार्ड मेंबर (मेंबर्स) इच्छितात की कोणत्याही मार्केटिंग ऑफर्ससाठी त्यांना कॉल केले जाऊ नये, तर ते फोन द्वारे 24 तास बँकेला किंवा cardservices@rblbank.com वर ईमेल पाठवून अशा रजिस्टर मध्ये त्यांचे उल्लेखित कॉन्टॅक्ट नंबर्स नमूद करण्याची सूचना करू शकतात. त्यांचे संबंधित संपर्काचे तपशील वगळण्यासाठी बँकेच्या वेबसाइट वर नोंदणी करा.

c. अशा घटनेमध्ये कि बँकेला प्रतिकूल सूचना मिळते (कार्ड मेंबरच्या क्रेडिट योग्यता संदर्भात किंवा असे काही जे असे प्रभावित करू शकते), बँक क्रेडिट कार्ड रद्द करू शकते, जेथे

संपूर्ण थकीत रक्कम तसेच क्रेडिट कार्डच्या वापराद्वारे आलेले पुढील कोणतेही फी/शुल्क, जे कदाचित अजूनही स्टेटमेंट मध्ये बिल केलेले नसतील, त्वरीत देय असतील आणि उल्लेखित कार्ड मेंबर द्वारे भरणा करायचे असतील.

d. कार्ड मेंबरने ज्या लाभ किंवा प्रोग्राममध्ये नोंदणी केलेली आहे त्यावर बँकेला लक्ष ठेवण्यासाठी, सेवा देण्यासाठी आणि सांभाळण्यासाठी तिसऱ्या पक्षांसोबत कार्ड मेंबर संदर्भातील माहिती शेयर करण्यासाठी कार्ड मेंबर बँकेला अधिकार देतो.

e. या विरुद्ध काहीही असले तरीही, कार्ड मेंबर बँकेला कार्ड मेंबरविषयी कोणतीही सर्व माहिती किंवा कागदपत्रे कोणत्याही उद्देश्यासाठी पुढील घटकांना उघड करण्यासाठी अधिकृ करतो/करते ज्यामध्ये या करारासह कार्ड मेंबर आणि बँकेमधील इतर कोणत्याही करार, व्यवहार किंवा सौद्यांचा समावेश आहे: a) बँकेचे प्रमुख कार्यालय, किंवा इतर कोणत्याही शाखा, सहायक किंवा संलग्न किंवा संबंधित कंपनी; b) बँकेचे व्यावसायिक सल्लागार; c) बँकेचे कोणतेही संभावित किंवा वास्तविक ग्राहक/ मुखत्यार किंवा त्यांचे कोणतेही व्यवसाय, अधिकार, मालमत्ता किंवा बंधने; किंवा d) असे इतर कुणीही व्यक्ती जेथे कायद्यानुसार उघड करणे आवश्यक आहे.

f. द क्रेडिट इंफॉर्मेशन ब्यूरो इंडिया लिमिटेड (सिबिल) हा भारतीय आर्थिक व्यवस्थेची कार्यक्षमता आणि स्थिरता सुधारण्यासाठी भारत सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचा एक उपक्रम आहे. बँका आणि वित्तीय संस्थांमध्ये माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा पुरवण्याच्या आरबीआयच्या प्रयत्नांनुसार हे आहे, ज्यामुळे ग्राहकांना विविध संस्थांकडून चांगल्या क्रेडिट अटींचा लाभ घेता येतो.

g. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व बँका आणि वित्तीय संस्थांना सिबिल आणि इतर क्रेडिट इन्फर्मेशन ब्युरोसोबत ग्राहकांचा डेटा शेअर करणे आवश्यक आहे. वरील बाबी लक्षात घेता, बँक कार्ड मेंबर (मेंबर्स)/ ॲड-ऑन

कार्ड मेंबर (मेंबर्स) खात्याशी संबंधित डेटा सिबिल आणि इतर क्रेडिट इन्फर्मेशन ब्यूरोला कळवेल.

h. कार्ड मेंबर मान्य करतो की, व्यवसाय पद्धती आणि लागू तरतुदींनुसार, बँकेने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार केलेल्या कोणत्याही विद्यमान किंवा भविष्यातील क्रेडिट ब्यूरो सोबत कार्ड मेंबरची माहिती शेअर करण्याचा बँकेला अधिकार आहे. उल्लेखित माहिती ही भारतीय आर्थिक व्यवस्था, आणि अशाच इतर संस्थाच्या कार्यक्षमता आणि स्थिरतेमध्ये सुधार करण्यासाठी सिबिल किंवा सक्षम प्राधिकरणांद्वारे स्वीकृती/ अधिसूचित अशाच इतर क्रेडिट इंफॉर्मेशन ब्यूरोसबत शेयर केली जाऊ शकते.

i. जर रिपोर्ट केलेला कार्ड मेंबर नंतर बँकेसोबत असलेली सर्व देय रक्कम बँकेच्या संतुष्टीनुसार चुकते करतो किंवा भरणा करतो, तर याची खात्री करण्यासाठी बँक पुरेसे प्रयत्न करेल की बदल दर्शवण्यासाठी उल्लेखित कार्ड मेंबरचे अद्ययावत केलेले तपशील सिबिल किंवा अशा इतर क्रेडिट इंफॉर्मेशन ब्युरोला दिली जाते.

j. मी आरबीएल बँकेला युआडीएआय कडून केवायसी म्हणून प्राप्त झालेली/ निवदेन अर्जामध्ये माझ्याद्वारे भरलेली माहिती केवायसी माहिती पडताळणी, क्रेडिट जोखिम विश्लेषण, किंवा इतर संबंधित उद्देश्यांसाठी, जे आरबीएल बँकेला योग्य वाटतात, बीएफएल/ क्रेडिट ब्युरो/ वैधानिक संस्था/ सहयोगी/ संलग्न/ क्रेडिट ब्युरो/ रेटिंग एजन्सी, सेवा पुरवठादार, बँक/ आर्थिक संस्था, सरकारी/ नियामक अधिकारी किंवा थर्ड पार्टी सोबत कोणतीही/ सर्व माहिती शेयर आणि उघड करण्याचा अधिकार देतो/ देते आणि संमती देतो/ देते. जर कार्ड मेंबर कोणत्याही आर्थिक सहाय्य/ सुविधा/ आर्थिक/ क्रेडिट सुविधेच्या मुद्दलची रक्कम किंवा व्याज/ शुल्काची देय रक्कमेची परतफेड करण्यांत किंवा भरणा करण्यात कसूरवार ठरतो, आरबीएल बँक आणि/ किंवा आरबीआयला डिफॉल्टचा तपशील आणि कार्ड मेंबर/ किंवा त्यांचे संचालक/ भागीदार/ ॲड-ऑन कार्ड धारकांचे, जसे लागू होते तसे, नाव अशा पद्धतीने आणि अशा माध्यमाद्वारे जे आरबीएल

बँक किंवा आरबीआयला त्यांच्या एकमेव विवेकबुद्धीनुसार योग्य वाटते तसे, उघड करण्याचा किंवा प्रकाशित करण्याता एक अपात्र अधिकार मिळेल. आरबीएल बँक क्रेडिट इंफॉर्मेशन कंपनी (रेग्युलेशन) अधिनियम, 2005 च्या अनुसार कार्ड मेंबरच्या क्रेडिट हिस्ट्री/ परतफेडीचे रेकॉर्ड आणि/किंवा देय स्थिती पूर्वीचे दिवसांच्या संदर्भातील माहिती क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्यूरोला जाहीर करेल. क्रेडिट कार्डसाठी अर्ज स्वीकारणे कार्ड मेंबरच्या क्रेडिट पात्रतेच्या प्रतिकूल नसण्याच्या अहवालांवर आधारित आहे. आरबीएल बँक कार्ड खात्यातील कोणत्याही कसूर विषयी इतर बँका किंवा आर्थिक संस्थांना कळवू शकते किंवा कार्ड किंवा इतर प्रकारे कार्ड मेंबरची क्रेडिट सुविधा मागे घेऊ शकते. प्रतिकूल अहवालांच्या प्राप्तीच्या आधारे (कार्ड मेंबर किंवा त्याच्या/ तिच्या कुटुंबातील सदस्यांच्या क्रेडिट योग्यतेच्या संदर्भात), आरबीएल बँक, लेखी 15 दिवसांच्या पूर्वसूचनेनंतर, क्रेडिट कार्ड रद्द करू शकते, जेथे कार्ड खात्यातील संपूर्ण थकीत रक्कम तसेच क्रेडिट कार्डच्या वापराद्वारे आलेले पुढील कोणतेही चार्जेस, जे कदाचित अजूनही कार्ड खात्यात बिल केलेले नसतील, कार्ड मेंबर द्वारे त्वरीत भरणा करायचे असतील. आरबीएल बँक कार्ड मेंबरला बँक किंवा आर्थिक संस्थेचे नाव उघड करण्यासाठी बांधील नाही, जेथून त्यांना ही माहिती मिळाली होती किंवा ज्यांनी ही माहिती उघड केलेली.

k. बँक कोणत्याही क्रेडिट कार्ड खात्यास फक्त तेव्हाच 'देय बाकी' म्हणून क्रेडिट इंफॉर्मेशन कंपन्यांना (सीआयसी) कळवेल, जेव्हा सदर क्रेडिट कार्ड खाते तीन दिवसांपेक्षा अधिक 'देय बाकी' राहते. 'देय बाकी दिवसांची' संख्या क्रेडिट कार्ड स्टेटमेंटमध्ये नमूद भरणा देय दिनांकपासून मोजण्यात येते.
क्रेडिट इंफॉर्मेशन कंपनी (सीआयसी) कडे क्रेडिट कार्डधारकास कर्तव्यचुकार म्हणून कळवण्याआधी, अशा कार्डधारकाला सीआयसी कडे बाकीदार म्हणून कळवण्याच्या उद्देश्याविषयी बँक त्याला/तिला सात-दिवसांचा सूचना कालावधी जारी करेल. बाकीदार

म्हणून कळवल्यानंतर ग्राहकाने त्याच्या/तिच्या देयकांची पूर्तता केल्यावर, देयकाची पूर्तता केल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत बँक स्थिती अद्यतन करेल.

(H) कार्ड सुरक्षा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) च्या आदेशानुसार, सुरक्षा उपाय म्हणून सर्व नवीन जारी, पुन्हा जारी आणि नूतनीकृत क्रेडिट कार्ड, देशांतर्गत पॉइंट ऑफ सेल (पीओएस) आणि एटीएम व्यवहार वगळता सर्व व्यवहारांसाठी निष्क्रिय स्थितीत पाठवले जातात. जर कार्ड मेंबरला देशांतर्गत, आंतरराष्ट्रीय, ऑनलाईन, पीओएस, कॉन्टॅक्टलेस आणि रोख पैसे काढणे या साररख्या कोणत्याही श्रेणीमध्ये वापरासाठी त्याचे/ तिचे क्रेडिट कार्ड सक्रिय/निष्क्रिय करण्याची इच्छा असेल. तर आवश्यक बदल करण्यासाठी कार्डमेंबरला www.rblbank.com वर भेट देण्याचा सल्ला दिला जातो.

कार्ड मेंबर लक्षात ठेवा की ज्या कार्ड्सचा वापर 18 महिने किंवा त्याहून अधिक काळासाठी ऑनलाइन / आंतरराष्ट्रीय / कॉन्टॅक्टलेस व्यवहारांसाठी केला गेलेला नाही ते त्या विशिष्ट श्रेणीसाठी ऑटो-डिसेबल/ स्वयंरित्या-बंद केले जातील. अशा कोणत्याही श्रेणीमध्ये वापरासाठी कार्ड मेंबरला त्याचे/ तिचे क्रेडिट कार्ड सक्रिय करण्याची इच्छा असल्यास जे निष्क्रियतेमुळे बंद करण्यात आलेले, कार्ड मेंबरला आवश्यक बदल करण्यासाठी www.rblbank.com ला भेट देण्याचा सल्ला दिला जातो.

(I) विशेष उल्लेख

खाते (एसएमए) आणि नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स/अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकरण आणि श्रेणीवाढ

जर एखाद्या कर्ज/क्रेडिट कार्ड खात्याची देय दिनांक 22 जानेवारी 2019 आहे, कर्ज देणाऱ्या संस्थेने या दिवसाची दिवस-अखेरची प्रक्रिया सुरु करण्याआधी संपूर्ण देयक मिळाले नाही, तर थकीत देयक दिनांक

22 जानेवारी 2019 असेल आणि खाते SMA-0 म्हणून वर्गीकृत केले जाईल.

जर संपूर्ण थकीत देयक (शुल्क सह, कोणतेही असल्यास) दुसऱ्या दिवशी (23 जानेवारी 2019) किंवा इतर पुढील तारखेला भरले जातात, तर खात्यातील डीपीडी दिवस अखेरपर्यंत शून्य होईल, आणि खाते नियमित म्हणून वर्गीकृत होईल.

जर खात्यात थकीत देयक कायम राहते, तर सदर खाते 23 मार्च 2019 म्हणजेच थकीत देयक सतत कायम राहण्याचे 60 दिवस पूर्ण केल्याच्या दिवशी दिवस-अखेर प्रक्रिया चालू झाल्यावर एसएमए-1 म्हणून वर्गीकृत होईल.

जर खाते अजूनही थकीत देय कायम ठेवते, तर 22 एप्रिल 2019 रोजी दिवस-अखेर प्रक्रिया सुरु झाल्यावर ते एनपीए म्हणून वर्गीकृत होईल.

मालमत्ता वर्गीकरण (म्हणजेच एनपीए श्रेणी) कर्जदार पातळीवर (म्हणजेच बँकेसोबत सर्व संबंधांमध्ये) वर्गीकृत केली जाईल.

एनपीए च्या संदर्भात, बँकेसोबत सर्व संबंधांमधील संपूर्ण थकीत देयक पूर्णपणे भरायचे आहे आणि जर कोणत्याही दिवशी कर्जदार पातळीवर थकीत देय रक्कम शून्य आहे, तर संपूर्ण संबंध श्रेणीवाढ साठी ग्राह्य धरण्यात येईल.

अस्वीकृती

*आरबीएल बँक तिच्या उत्पादनांच्या संदर्भात, तिच्या स्वेच्छानिर्णयानुसार, जसे आवश्यक किंवा गरजेचे असेल त्यानुसार अशा अटीवर आणि बाह्य सेवा पुरवठादार किंवा एजंट्सच्या सेवा वापरू शकते.

RBL_CC/MITC/28/02/2024

www.rblbank.com

आरबीएल बँक लिमिटेड
कार्ड ऑपरेटिंग सेंटर: युनिट 306-311, तिसरा मजला, जेएमडी मेगापोलिस, सोहना रोड, सेक्टर - 48, गुरगाव - 122 018, हरियाणा.
CIN: L65191PN1943PLC007308